महाराष्ट्र शासन
कामगार आयुक्तालय
कामगार भवन, प्लॉट क्र.सी-२०, ब्लॉक-ई, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पू.), मुंबई-४०००५१
ई-मेल : mathadisrmbharti@gmail.com दुरध्वनी क्र. ०२२-२६५७३८६९

क्र.माथाडी-सुरक्षा-पदभरती/२०२६/कार्या-१४/८०५ दि.: 15 OCT 2026

प्रसिध्दीपत्रक

राज्य शासनाच्या कामगार विभागाअंतर्गत कामगार आयुक्तालयाच्या निरीक्षक, लघुटंकलेखक व लेखापाल गट-क सरळसेवा पदाकरीता दिनांक २९ व ३० जुलै, २०२६ रोजी घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये गैरप्रकार झाल्याचे सन्माननीय लोकप्रतिनिधी श्रीमती सुषमा अंधारेजी यांनी आज दिनांक १५ ऑक्टोबर, २०२६ रोजी घेतलेल्या पत्रकार परिषपदेमध्ये नमूद केल्याची बाब समाजमाध्यमांवर प्रसारीत होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

तद्नुषंगाने कामगार आयुक्तालयाकडून स्पष्ट करण्यात येते की, सदरच्या परीक्षेतील अंतिम निकाल अद्याप प्रसिध्द केलेला नाही. दिनांक ०६/१०/२०२६ रोजी केवळ गुणपत्रिका कामगार आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे, याची नोंद घ्यावी.

माथाडी व सुरक्षा रक्षक
भरती प्रक्रिया समिती,
महाराष्ट्र राज्य